# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

## कृषी विद्यापीठातील अव्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश २०१८-१९

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे.

### <u>उपलब्ध अव्यावसायिक पदवी अभ्यासक्रम</u>

| (१) बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) | (२) बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) |
|---|---|

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया कल्प टेक्नॉलॉजी प्रा.लि., पुणे (केटीपीएल) यांचेद्वारा ऑनलाईन पध्दतीने पूर्ण करण्यात येत आहे. यासाठी प्रवेश माहिती पुस्तिका कृषी परिषद व 'केटीपीएल' च्या अनुक्रमे **www.mcaer.org** व **maha-agriadmission.in** या संकेतस्थळांवर दि. ०५ जुलै,२०१८ पासून उपलब्ध करून देण्यात येईल. प्रवेशोच्छुकांनी '**maha-agriadmission.in**' या संकेतस्थळावरून प्रवेश माहिती पुस्तिका प्राप्त करून घ्यावी.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती-**

- उमेदवारांने **maha-agriadmission.in** या संकेतस्थळाद्वारे दि. १६ जुलै,२०१८ पर्यत ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. यानंतर प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध नसेल.
- 'ऑन लाईन' भरतांना उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी, आवश्यक ती संबंधित मूळ कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.
- प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे हातबटवडयाने / टपालाने / कुरीअरने पाठवू नयेत.
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड किंवा नेट बँकीगद्वारे भरावे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क-**

खुल्या प्रवर्गासाठी रु. १०००/-

आरक्षित प्रवर्गासाठी रु. ५००/- (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.व*.)

[जात वैधता प्रमाणपत्र तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.]

प्रवेश पात्रता, प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

क्र. मकृप/शिक्षण-१/२५१८/१५०५

दिनांक- ३ जुलै,२०१८

(रविंद्र जगताप) भा प्र से

महासंचालक,

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,पुणे